झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/ ६७० /२०२३
दिनांक २४ /०८ /२०२३

575

**झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश**

**प्रस्तावना -**

पांढारकरनगर, आकुर्डी, येथील स.नं.१७३/१अ/२, सि.स.नं.४६६१पै अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०८/०६/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.०९/०६/२०२३ रोजी डकविण्यात आली असून दि.०९/०६/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र निरोप्या (पुणे) व केसरी या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जुन २२-२८, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.१३, १४ व १५ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

(३) ज्याअर्थी उप अभियंता, तांत्रिक विभाग क्र.३, झोपुप्रा, पुणे यांनी दि.१५/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ७/१२ उता-यानुसार येणारे क्षेत्र हे २९६८.०० चौ.मी. इतके आहे व मोजणी नकाशानुसार त्रिमितीय पध्दतीने येणारे क्षेत्र हे २९१७.७९ चौ.मी. इतके आहे, असे कळविले आहे. त्यामुळे सदर योजनेकरिता विचारात घ्यावयाचे कमीत कमी क्षेत्र २९१७.७९ चौ.मी. हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(४) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे सदर बाबत कोणतीही हरकत अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

(६) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता वर नमूद मुद्दा क्र. ३ पैकी कमीत कमी क्षेत्र २९१७.७९ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण २९१७.७९ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमतः घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१७३/१अ/२, सि.स.नं.४६६१पै, पांढारकरनगर, आकुर्डी, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| ठिकाण- पांढारकरनगर, आकुर्डी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१७३/१अ/२, सि.स.नं.४६६१पै | खाजगी | २९१७.७९ चौ.मी. | रस्ता | रस्ता | स.नं.१७३पै, सि.स.नं. ४६६१ पै | सि.स.नं. ४६६१/१ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- २४/०८/२०२३.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.
२. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
३. विकसक मे. साईगुरु कन्स्ट्रक्शन - यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर.